**पाहिजेत**

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४



दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८७ ■ गुरूवार, दि. ६ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -287 ■ Thursday, 6 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## बिल्डरच्या अपहृत मुलाच्या सुटकेचा थरार;

# २ कोटींची मागितली होती खंडणी; अपघात झाला अन् मिळाली तपासाची लिंक, ३ जणांना अटक

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथे मंगळवारी रात्री शहरातील नामांकित बिल्डरच्या मुलाचे २ कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण केले होते. या प्रकरणातील तिघांना पोलिसांनी अटक केली असून मुलाची देखील सुखरूप सुटका करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

मंगळवारी रात्रीच्या सुमारास ७ वर्षीय चैतन्य सुनील तुपे हा वडिलांसोबत घराबाहेर फिरत होता. यावेळी काळ्या रंगाची चारचाकी तिथे आली आणि वडिलांच्या समोरच मुलाचे अपहरण केले. ही घटना मंगळवारी रात्री घडली होती. अपहरणाचा प्रकार सीसीटीव्हीमध्ये देखील कैद झाला आहे. यावेळी अपहरणकर्त्यांनी मुलाची सायकल देखील रस्त्याच्या कडेला टाकून दिल्याचे दिसत आहे.

कसे झाले अपहरण?

मंगळवारी रात्रीचे जेवण झाल्यानंतर सुनील तुपे आपला मुलगा चैतन्यसह (७ वर्षे) फिरण्यासाठी घराबाहेर पडले होते. सुनील पुढे चालत असताना मुलगा सायकलवर मागे होता. सिडको एन-४ च्या भागात ते होते. रात्रीचे ८.४० झाले अनब एक काळ्या रंगाची चारचाकी आली. सेंट्रल मॉल येथून आलेल्या या चारचाकीतून तिघे जण उतरले अनब त्यांनी सुनील यांच्यासमोर त्यांच्या मुलाचे अपहरण केले. ही चारचाकी आधी जयभवानीनगरकडे गेली नंतर सिडकोमार्गे शहराबाहेर पळून गेले.

असा लागला चैतन्यचा शोध

अपहरणकर्ते छत्रपती संभाजीनगर येथून सिल्लोड, भोकरदन या मार्गाने माहोराकडे गेले. म ाहोराकडे जात असताना त्यांच्या कारला अपघात झाला. आसई पाटीजवळ भाजीपाला भरण्यासाठी थांबलेल्या चक २१ इक ६०४८ (जीतो) मालवाहू लोडिंग गाडीला जोरदार धडक दिली व पथदिव्याच्या खांबाला धडकून बलेनो कार दहा ते पंधरा फूट फरफटत रस्त्याच्या बाजूला असलेल्या सुखदेव जाधव यांच्या शेतात गाडी जाऊन पडली. अपघातात गाडीचा समोरचा भाग चुराडा झाला.

अपघातानंतर अपहरणकर्ते आरोपी ज्ञानेश्वर, जीवन व बंटी हे तिघे चैतन्यला घेऊन अंधारात पसार झाले. प्रणव हा अत्यंत जखमी अवस्थेत होता. पळून जाण्याच्या तयारीत असताना लोडिंग गाडी मालक गजानन भावले रा. वालसा याने व इतर ग्रामस्थांच्या मदतीने प्रणवला पकडले. जखमी अवस्थेतील प्रणवला भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले.

भोकरदन पोलिसांना या घटनेची माहिती मिळाली असता पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत व इतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी गेले त्यांनी सायरन वाजवून आरोपींना शरण येण्यास बाबत आवाहन केले. मात्र तोपर्यंत आरोपी हे अंधाराचा फायदा घेत मुलाला घेऊन पळून गेले होते. आरोपींपैकी शिवराज व जीवन यांनी फोन करून एका

पान ३ वर





### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतली दखल

या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतल्यामुळे जालन्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल भोकरदन पोलीस ठाण्यात तळ ठोकून होते. छत्रपती संभाजी नगर जालना व भोकरदन जाफराबाद टेंभुर्णी पोलिसांच्या संयुक्त पथकाने हे ऑपरेशन यशस्वीरित्या पूर्ण केले. उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे पोलीस निरीक्षक किरण बिडवे, संभाजीनगर गुन्हे अन्वेषण विभागाचे संदीप गुरमे, विशाल बोडखे, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सचिन खामगळ, भोकरदन चे पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत व इतर कर्मचारी यांनी ही कारवाई केली.

## आमदार सुरेश धस हे आधुनिक भगीरथ; मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कामाची प्रशंसा

आष्टी : बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी लावून धरले आहे. संतोष देशमुख यांच्या मारेक□यांना शिक्षा व्हावी यासाठी सुरेश धस यांनी अनेक मोर्चे काढले होते. या प्रकरणात सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांनाही लक्ष्य केले आहे. त्यामुळे राष्ट्र वादीच्या नेत्यांकडून सुरेश धस यांना आवर घालण्याची मागणी करण्यात येत होती. आमदार सुरेश धस हे आधुनिक भगीरथ असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

बीडच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले आहे. यावेळी आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनावणे आणि मंत्री पंकजा मुंडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुरेश धस यांच्या कामाचे कौतुक केले. सुरेश धस मागे लागले की डोके खाऊन टाकतात असेही मुख्यमंत्री फडणवीसांनी म्हटले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर कारवाई होणारच, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिली.

**देवेंद्र फडणवीस बिनजोड पैलवान : सुरेश धस**

मला कुणाकडून अपेक्षा नाही, देवेंद्र बाहुबली मदत करू शकतात, असा विश्वास व्यक्त करत संतोष देशमुख खून प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कणखर भूमिका घेतली. बीड जिल्ह्याची बदनामी होतेय, असे काही लोक म्हणतात. पण काही ठराविक राजकारण्यांनी गुन्हेगारी वृत्तीला पाठिंबा दिल्याने जिल्ह्याची प्रतिमा मलीन झाली होती. संतोष देशमुख खून प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी कणखर भूमिका घेतली. कुणालाच सोडणार नाही असे सांगितले.

## संत तुकाराम महाराजांच्या वंशजाने केली आत्महत्या

**देहू :** संत तुकाराम महाराज यांचे अकरावे वंशज प्रसिद्ध व्याख्याते हरि भक्त परायण शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली. शिरीष महाराज यांनी राहत्या घरी गळफास लावून घेतला. शिरीष महाराज मोरे यांचे पार्थिव पोलिसांनी शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले आहे. संध्याकाळी चार वाजता शिरीष महाराजांच्या पार्थिवावर देहू गावातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जातील.

शिरीष महाराज यांचे लग्न ठरले होते. टिळ्याचा कार्यक्रम झाला होता. यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल का उचलले यावरुन चर्चेला उधाण आले आहे. पोलिसांनी आणि मोरे कुटुंबाने नागरिकांना अफवांवर विश्वास ठेवू नका असे आवाहन केले आहे. आत्महत्येप्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. शिरीष म हाराजांची कृती देहूकरांसाठी आणि मोरे कुटुंबीयांसाठी धार्मिक अध्यात्मिक आणि कौटुंबिक नुकसान करणारी आहे. या प्रकरणी अफवांवर विश्वास ठेवू नका, पोलीस तपासात सत्य कळेल; असे मोरे कुटुंबातील सदस्य म्हणाले. ज्याच्या कपाळी नाही टिळा, त्याच्याकडून खरेदी करणे टाळा; असे आवाहन शिरीष महाराज मोरे यांनी काही काळापूर्वी केले होते.

## म्हैसमाळ येथील गिरजा देवी यात्रेची जय्यत तयारी सुरु

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील मराठवाड्याचं महाबळेश्वर म्हणून ओळख असलेल्या म्हैसम ाळ येथे पुरातन कालीन गिरजा देवी मंदिर असुन, सालाबादा प्रमाणे या ठिकाणी माघ पोर्णिमेनिमित्त यात्रा भरते,तीन दिवस चालणारया या यात्रेत राज्य भरातुन लभाणी समाज दर्शनासाठी हजेरी लावतो. म्हैसमाळ येथील यंदाच्या माघ पोर्णिमेनिमित्त भरणारया यात्रेची सुरुवात बुधवार (दि.१२) पासुन गिरीजा देवीचे अलंकार वस्त्र चढविणे, महापुजा रात्री काठीची मिरवणुक झाल्यानंतर शुक्रवारी (दि.१५) महा अभिषेक व महाप्रसादाने यात्रेची सांगता होणार आहे.या यात्रे निमित्त रेवड्यांची दुकाने मोठ्या प्रमाणात येतात, त्याच बरोबर कटलरी, उपहारगृहे यांची संख्याही मोठी असते, या यात्रेची जय्यत तयारी गिरजा मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार स्वरुप कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीच्या समन्वयातुन सुरु आहे.



म्हैसमाळ येथील गिरजा देवीच्या माघ पोर्णिमे निमित्त भरणारया यात्रेत नवस म्हणुन रेवड्यांची उधळण केली जाते, त्यामुळे या जत्रेत रेवड्यांच्या दुकानांची संख्या मोठी असते.

म्हैसमाळ येथील गिरजा देवी मंदिराचा जिर्णोध्दार करण्यात आला असुन, प्रशस्त गर्भगृहासह मंदिरासमोर दिमाखदार स्वरुपातील सभामंडप यामुळे भाविकांचे दर्शन सुकर होत आहे.

## सोशल मीडियावर शस्त्रांसह रील्स काढणाऱ्यांची चौकात काढली धिंड; रील्स काढणे ८ तरुणाला भोवले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पाचोड परिसरात हुल्लडबाज तरुणांकडून इन्स्टाग्रामवर रील्स काढून दहशत पसरवण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. हातात धारदार शस्त्र घेऊन सोशल मीडियावर रील्स काढण्यात आली होती. हे प्रकरण पाचोड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांच्या ( ता.३) रोजी रात्री उशिरा निदर्शनास आले. या वेळी त्यांनी तातडीने काही तरुणांच्या इन्स्टाग्रामवर जाऊन शहानिशा केली. यात १)विनोद भीमराव राजकर, २) कृष्णा भीमराव राजकर, ३)विजय बाबासाहेब राऊत ४)विशाल अशोक शेळके, ५)आदिल राजू वाघ , ६)नचिकेत घनश्याम पालवे, ७)अंबादास प्रकाश वाघ, ८) करण अर्जुन शेळके या तरुणांच्या रील पाहून या तरुणांना ताब्यात घेतले आहे. या रीलमध्ये काही तरुण कमरेला कट्टा, हातात कोयता, धारदार शस्त्र घेऊन कॉलर उडवत इन्स्टाग्रामवर रील व्हायरल करत होते. मंगळवारी पोलिसांनी यांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. तसेच या तरुणांची पाचोड येथील पाचोड-पैठण चौकातून धिंड काढत पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. दहशत खपवून घेतली जाणार नाही भपाचोड परिसरामध्ये जर असे कोणी सोशल मीडियावर रील काढून दहशत पसरवत असेल तर त्याची माहिती तातडीने पाचोड पोलिस ठाण्यात द्यावी, माहिती देणाराचे नाव गोपनीय ठेवले जाईल. पाचोड परिसरामध्ये असली कुठली दहशत खपवून घेतली जाणार नाही, असे - शरदचंद्र रोडगे, सहायक पोलिस निरीक्षक, पाचोड यांनी सांगितले.



## वेरूळ शिवारात बिबट्याने पाडला गायीचा फडशा!

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील वेरूळ येथील श्री विद्या वामदेव तीर्थ स्वामी महाराज यांच्या टाका आश्रम अंतर्गत असलेल्या श्रीकृष्ण गोशाळेतील एका गायी वर मंगळवारी मध्यरात्री बिबट्याने हल्ले करून गायीचा फडशा! वेरूळ शिवारात बिबट्याचा वावर वाढला असल्याने वन विभाग मात्र अनभिज्ञ अवस्थेत दिसून येत आहे. सदरील घटना ही गोशाळेच्या मागील बाजूस घडली असून या गोशाळेत एकूण ३०० हून अधिक गायी आहेत.सकाळी सात वाजेच्या सुमारास येथील गोशाळेतील कामगार हे साफसफाई करत असताना मागील बाजूस मृत झालेली गाय आढळून आली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात येत आहे.

या पूर्वी देखील बिबट्याच्या हल्ल्यात गायी म्हैस आणि बकऱ्यांचा फडशा पाडला होता या आधीही बिबट्याने केला हल्ला काही दिवसांपूर्वीच वेरूळ शिवारातील शेकापुरी, शार्दुलवाडी,तलाववाडी, मांबापुरवाडी येथील शेत वस्तीवर बिबट्याने हल्ला करून दोन बकऱ्या तीन वासरी आणि एका म्हशीवर हल्ला करून त्यांचा देखील फाडशा पाडला होता. तेव्हा देखील वन विभागाने कुठली ही खबरदारी न घेता बिबट्याचा बंदोबस्त न करता केवळ वेळ मारून नेली असल्याने दिवसें दिवस परिसरात बिबट्याची दहशत मोठी वाढली आहे. सध्या वेरूळ परिसरात रात्रपाळीची वीज असल्याने शेतकरी रात्री अपरात्री गहू व अन्य पिकाला रात्री पाणी, देण्यासाठी शेतात जात असल्याने त्यांच्या देखील जीवाला धोका वाढला आहे तसेच शेतावर काम करण्यासाठी मजूर ही मिळेल असे झाले असल्याने या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ही शेतकरी वर्गातून वाढली आहे. पळसवाडी तांडा वेरूळ तांडा तलाववाडी शार्दुलवाडी आणि खुद्द वेरूळ गावात चार गोशाळा असल्याने येथे देखील हजारो जनावरे आहेत. तरी वन विभागाने तात्काळ कारवाई करून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच सदरील श्रीकृष्ण गोशाळा ही वेरूळ लेण्यां पासून अगदी हाकेच्या अंतरावर असल्याने लेणी परिसरात देखील देश-विदेशातील हजारो पर्यटक दररोज भेट देत असतात, परिणामी पर्यटकांचा जीव देखील धोक्यात येण्याची शक्यता असल्याने वनविभागाने घटनेचे गांभीर्य ओळखून या बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सतीश फुलारे यांनी केली आहे.

## खुलताबाद शहरातील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करा..!

# खुलताबाद शहराला अतिक्रमण मुक्त करा...!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळ असलेले एकमेव खुलताबाद तालुका आहे. या तालुक्यात जग प्रसिद्ध वेरुळ लेणी, ज्योर्तीलिंग चे मंदिर, भद्रा मरोति चे मंदिर, अनेक सूफ़ी संत लोकांचे दरगे आहेत. मुग़ल सम्राट औरंगजेब यांची कबर सुद्धा खुलताबाद शहरातील एका दरगा मधे आहेत. खुलताबाद शहर मधे बनी बेगम चे सुन्दर बाग आहे

खुलताबाद शहराला आठ दरवाजे आहेत. दरवाजे ची स्थिति फार खराब झाली आहे. काही दरवाजे चे पड़ झड़ होत आहे शहरातील माध्यभागी असलेला मोठा दरवाजा मधे लोकानी अतिक्रमण करुन हॉटेल थाटलेले आहे. दरवाजा चे आजु बाजु ला अतिक्रमण करुन दुकाने ठाटलेली आहे. नगर पालिका चे मुख्य अधिकारी यांचे काही लक्ष नाही. नगर पालिका ची जनरल बॉडी ची मुदत संपली असल्यामुळे खुलताबाद नगर पालिकावर प्रशासक राज आहे.

स्थानिक सारे पक्षा चे नेते, माजी नगरअध्यक्ष, माजी उप नगरअध्यक्ष माजी नगर सेवक या लोकानी सुद्धा खुलताबाद शहर कड़े खास लक्ष दिलेले नाही. त्यामुळे खुलताबाद शहराची परिस्थिति अत्यंत खराब झालेली आहे. खुलताबाद शहर मधे प्रत्तेक लोकानी अतिक्रमण करुन शहरातील रास्ते अरुन्द केले आहे. रास्ते अरुन्द असल्यामुळे शहरत वाहतुक जाम होउन शुल्क कारना वरुन भांडण होत आहे

शुल्क कारणवरुण भांडण मुळे शहरातील कायदा वो सु व्यवस्था अबधित होउन शहरातील शांतता भंग होत आहे. खुलताबाद शहरा मधे लोकांनी आपल्या घरा समोर अतिक्रमण करुन ओटे बांधून रस्ता अरुन्द केला आहे.




अतिक्रमण चे कारना वरुन आपसात वाद विवाद होउन त्याचे रूपांतर मोठे भांडण होत आहे.

खुलताबाद शहरातील मुख्य रस्ता नगार खाना दरवाजापासून ते हफ़ीज खलील चौक डॉ. बाबासाहेब अम्बेडकर यांचे पूतळ्या पर्यंत रस्ता रुन्दी करण मंजूर झालेले आहे अनेक वर्षा पासून खुलताबाद शहरातील रस्ता रुन्दीकरण थंड बस्त्यात पड़लेले आहे. या साठी खुलताबाद शहरातील प्रत्तेक नागरिक आणि सारे राजकीय पक्षा चे नेते तसेच माजी नगर अध्यक्ष, माजी उप नगर अध्यक्ष, माजी नगर सेवक तसेच खुलताबाद नगरपालिका चे मुख्य अधिकारी, नगर पालिका चे अधिकारी कर्मचारी हेच जवाबदार आहेत. हजारोंच्या संख्याने देश विदेशा तुन येवून भेट देणारे प्रयटक खुलताबाद शहराला भेट देत नाही. पर्यटकमुळे होणारा उद्येग व्यवसाय ही ठप्प झालेला आहे. या साठी खुलताबाद शहराचे डेवलअप मेन्ट प्लान मधे मुख्य रस्ता रुन्द करुन अतिक्रमण काढून खुलताबाद शहराला सुंदर शहर करण्यात यावे, अशी मागणी खुलताबाद शहरातील नागरिक यांचे कडून होत आहे.

## कुस्तीची लक्तरे वेशीवर

महाराष्ट्राच्या आदर्श संस्कृतीची आणि कुस्ती या मानाच्या खेळाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. महाराष्ट्राच्या भूमीत अनेक रत्नांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये 'न भूतो न भविष्यति' कामगिरी करुन राज्याची मान उंचावली आहे. रविवारी अहिल्यानगर येथे राज्य कुस्तीगीर संघ आणि जिल्हा कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने ६७ वी महाराष्ट्र केसरी स्पर्धा पार पडली. परंतु, अंतिम सामन्यात निकालावरुन सोलापूरच्या महिंद्र गायकवाड याने केलेला राडा आणि तत्पूर्वी झालेल्या उपान्त्य सामन्यात नांदेडचा डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने पंच दत्ता माने यांची कॉलर पकडत केलेला लत्ताप्रहार हे दोन्ही प्रसंग निश्‍चितच लांच्छनास्पद होते. या दोन कुस्तीगीरांची वर्तणूक खरोखरच चिंता वाढवणारी आहे. मानाच्या आणि प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेमध्ये असा प्रकार कधीच घडला नव्हता. अंतिम फेरीचा सामना झाल्यानंतर वरील घटनांचा निषेध करीत स्पर्धेतील पंचांनी मैदानावर ठिय्या देऊन आंदोलन केले. साहजिकच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने दोन्ही मल्लांवर निलंबनाची कारवाई केली. स्पर्धेसाठी सलग चार दिवस पंच म्हणून १०५ जण कार्यरत होते. रविवारी झालेल्या राड्या प्रकरणी महाराष्ट्राचा डबल केसरी चंद्रहार पाटील यांनी वादग्रस्त विधान केले आहे. शिवराजने लाथ घातली ही चूकच झाली. त्याऐवजी शिवराजने पंचांना गोळ्याच घालायला हव्या होत्या, अशी संतप्त भावना चंद्रहार पाटील यांनी व्यक्त केली. कुस्तीगिराची पंधरा-वीस वर्षांची तपश्‍चर्या अशा एका निर्णयाने आयुष्य उद्ध्वस्त करणारी ठरू शकते. खरे तर हे प्रकरण अधिक कौशल्याने हाताळता आले असते. अंतिम दिनी कुस्तीगीर संघाचे महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित असताना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समोरच हा सारा लाजिरवाणा प्रसंग झाला. एकंदरीत परिस्थिती पाहिली असता कुस्तीगीर, पंच या साऱ्यांचेच प्रथमदर्शनी काही ना काही चुकल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. शिवराज राक्षे याने रिव्ह्यू दाखवण्याची केलेली मागणी मान्य करायला काहीच हरकत नव्हती. एखाद्या स्पर्धकाने आक्षेप घेतल्यानंतर पंच निकाल देऊ शकत नाहीत. हा जर नियम असेल तर या नियमाचे उल्लंघन कोणी केले. याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. राक्षे याने केलेली कृती राक्षसी स्वरुपाचीच आहे. या साऱ्या गदारोळानंतर कुस्ती क्षेत्रातील अनेक अभ्यासकांनी कुस्तीमध्ये राजकारण आणि फिक्सिंग झाल्याचा आरोप केला आहे. असाच आरोप यापूर्वी क्रिकेटमध्येदेखील झाला होता. त्यावेळी श्रीनाथ या गोलंदाजाची कारकिर्द उद्ध्वस्त झाली होती. ऑलिम्पिक स्पर्धेवेळीदेखील फोगट या महिला कुस्तीपटूबाबत प्रचंड वाद झाला होता. महाराष्ट्र केसरी स्पर्धेला लाभलेली वादाची किनार निश्‍चितच भूषणावह नाही. कुस्तीला पुन्हा सन्मान मिळवून देण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.


# करुणामूर्ती माता रमाई !

भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा ९ वर्षाची व भीम राव १४ वर्षाचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पध्दतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते. तेव्हा रमाच्या कोवळया मनावर आघात झाला. परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला. सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंगत नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दुःखाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बाण्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान असते, हे आपणांस रमाईत आढळते.

भीम आम्हा शेषितांच्या मायेचा पदर
तू त्या पदराची सोनेरी किनार गं रमाई !
भीम वणवा जुल्मी व्यवस्था जाळणारा
तू त्या वणव्याची ठिणगी गं रमाई
भीम जरी जगी ओळख भारताची
तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !

अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी-थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय ? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, १९१४ ते १९१७ दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ ला बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या.

घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टराची पत्नी शेण वेचते म्हणून लोकं नावे ठेवतील, या भितीने त्या पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८ नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असंत, मुलांसाठी उपास करत असंत. बाबासाहेबांशिवाय दुसरा कूणीच पाठराखा नव्हता, त्यामुळेच त्यांना उपरोक्त उपक्रम करावाच लागला. पोटाची खडगी भरणे गरजेचं होतं. दोन वेळचं जेवन सुध्दा नशीबी नव्हतं. इतके कष्ट रमाईने सोसले. त्याची आच मुलांना सुध्दा लागू दिली नाही. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई!



बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे म्हणून बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही. ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. त्यामुळे ती खेळायला बाहेर आली नाहीत. ते रमाईला कंठ दाटून सांगत असतांना, रमाई लगेच आपल्या खोली मध्ये गेल्या आणि रडत बसल्या त्यांनाही ते दुःख सोसावेना

. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या, "तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकून किंवा गहान ठेवून ह्या लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या. मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत". त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात, लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण झाल्यावर. खूप आनंदी असतात. हे पाहून रमाई देखील आनंदी झाल्या. त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला, मन गहिवरुन आलं. सगळी लहान मुले रमाबाई यांना "रमाआई" म्हणून नाचू बागडू लागली. आणि त्या क्षणा पासून रमाबाई ही माता रमाई झाली. आणि ती सगळ्यांची आई झाली.

ख्यातनाम गायक, मिलिंद शिंदे म्हणतात, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, बांगड्या सोन्याच्या रमानं दिल्या काढुनी.. धन्य रमाई.... धन्य रमाई....

अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करु लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वतः च्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत करत होती. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज व त्यांना मानणारा चाहता वर्ग मुंबई बंदरात आला. साहेबांचे स्वागत बघण्यासाठी माईला सुध्दा जायचे होते. परंतू, नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती तेव्हा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच जनासागर उफाळून आला, त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त्यांना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते.

रमाईनी अठ्ठावीस वर्षे बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावर त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत, "साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा." असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्याचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवहीत टिपण्यास सांगत, इतकी ती त्यांना जोपासत होती. हळवं मन मितभाषी अत्यंत स्वाभिमानी अशा रमाई होत्या. साहेबांसाठी जिवाचं रान करणारी रमाई त्यांना कसलीही इजा होणार नाही यासाठी धडपडणारी रमाई !

रमाईचं शरीर काबाड कष्टाने पोखरून खंगुन गेलं होतं, रमाईचा आजार बळावला होता. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असत. त्यांचा आजार काही केल्या बरा होत नव्हता. बाबासाहेबांना दुःख अनावर होत होतं. अस्वस्थपणा जाणवत होता, ते काहीच बोलू शकत नव्हते, निमूटपणे रमाई कडे बघत होते. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंताबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. २७ मे १९३५ रोजी सकाळी ९ वाजता रमाईची प्राण ज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. कोट्यवधी रंजल्या गांजल्याची रमाई माता त्यांना अंतरली होती. दुपारी २ वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली. आम्हा दुरावली मायेची सावुली. निर्वाण पावली आमची रमाई माऊली. पहाडासारखे बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या त्यामुळे बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले.

बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाईवर निस्सीम प्रेम होते. तिचे कष्ट पाहून त्यांचे मन तुटायचे. त्यांनी आपल्या रामूला पाठवलेल्या पत्रात त्यांच्या या भावना प्रतिबिंबित व्हायच्या. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा आपला ग्रंथ बाबासाहेबांनी आपल्या 'प्रिय रामू' ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ''तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली- जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणींत कोरलेले हे प्रतीक...'' आपल्या पत्नीबद्दलच्या भावना बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत. आजच्या दिनी त्यागमूर्ती माता रमाईच्या १२७ व्या जयंती निमीत्त विनम्र अभिवादन !

**- प्रविण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

## कर्नाक रेल्वे उड्डाणपूल : अडचणींवर मात केले काम, आयुक्तांनी केला अभियंत्यांचा सत्कार

मुंबई : मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डि'मेलो मार्गाला जोडणा-या कर्नाक रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पातील दोन तुळया (गर्डर) रेल्वे भागात सरकविण्याची कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल महानगरपालिकेच्या पूल विभागातील अभियंत्यांचा महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान करुन सत्कार करण्यात आला. कर्नाक रेल्वे उड्डाणपूल उभारणी कामात महानगरपालिकेच्या वतीने रेल्वे प्रशासनासोबत समन्वय साधण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे उपप्रमुख अभियंता (पूल) राजेश मुळे, कार्यकारी अभियंता (पूल) (निवृत्त) सखाराम जाधव, सहायक अभियंता कुणाल वैद्य, दुय्यम अभियंता अभिषेक देवळेकर यांचा सत्कारार्थींमध्ये समावेश आहे. मुंबई महानगराच्या विकासात अभियंत्यांची कामगिरी अभिमानास्पद असल्याचे गगराणी यांनी यावेळी नमूद केले.

या सत्काराप्रसंगी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी म्हणाले की, मुंबई महानगराच्या विकासात अभियंत्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मुंबईकरांचा प्रवास अडथळाविरहित आणि सुखकर करणारे पूल, रस्ते विभागातील अभियंता, कर्मचारी - अधिकारी म्हणजे महानगरपालिकेचा कणा आहे. मुंबईच्या भौगोलिक परिस्थितीत दैनंदिन कामकाज करणे आव्हानात्मक आहे. अनेक अडचणी आणि आव्हानांवर मात करत अभियंते कामकाज यशस्वीपणे करत आहेत, असे उद्गार श्री. गगराणी यांनी व्यक्त केले. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, विशेष कार्य अधिकारी (महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय) चंद्रशेखर चोरे, प्रमुख अभियंता (पूल) उत्तम श्रोते यावेळी उपस्थित होते. दक्षिण मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मशीद बंदर आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी कर्नाक पूल महत्त्वाचा आहे. लोकमान्य टिळक मार्गावरील कर्नाक पूल धोकादायक झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले आहे. या प्रकल्प अंतर्गत ५५० मेट्रिक टन वजनाची दक्षिण बाजूची लोखंडी तुळई दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी आणि उत्तर बाजूची लोखंडी तुळई दिनांक २६ ते ३० जानेवारी २०२५ रोजी रेल्वे भागात सरकविण्याची कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे.

# माई रमाई: बाबासाहेबांची सावलीच!

### (७-१४ फेब्रुवारी: माता रमाई आंबेडकर जयंती सप्ताह विशेष)



विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफफडून दगावले. म्हणूनच माईच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता. ही प्रेरणादायी माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक यांच्या शब्दांत... संपादक

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफफडून दगावले. म्हणूनच माईच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ-शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईचे मुंबई येथे दुःखद निर्वाण झाले.

!! माता रमाई जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या अपूर्व त्यागाला विनम्र अभिवादन !!

पान १ वरून

## २ कोटींची मागितली होती खंडणी; अपघात झाला अन् मिळाली तपासाची लिंक, ३ जणांना अटक

व्यक्तीला फोन केला आणि जाफराबादला निघून गेले. जीवन हा रात्रभर जाफराबाद बस स्थानकावर झोपून होता तर दुसरा आरोपी शिवराज हा एका जेसीबीवर चालक म्हणून काम करतो तो नेहमीप्रमाणे बुधवारी जेसीबीवर कामावर गेला असता पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. ज्ञानेश्वर उर्फ हर्षल शेवत्रे हा चैतन्यला घेऊन रात्रीच घटनास्थळावरून पसार झाला त्याने त्याच्या भाऊ गणेशला फोन केला .सुरुवातीला तो चैतन्यला घेऊन जाफराबाद त्यानंतर ब्रह्मपुरी व मंगरूळ शिवारामध्ये एका मकाच्या शेतामध्ये लपून बसला होता. पोलिसांनी हर्षलच्या मोबाईलचे लोकेशन व तपासून हर्षलच्या भाऊ गणेशला ताब्यात घेऊन चौकशी केली व भावाच्या फोनवरून हर्षल ला फोन करून अत्यंत शिताफीने हर्षलला अटक केले व मुलाची सुटका केली.

या सर्व प्रकरणाचा मास्टर माईड मुख्य आरोपी हा ज्ञानेश्वर उर्फ हर्षल शेवत्रे हा आहे. तो छत्रपती संभाजीनगर येथे राहतो. छत्रपती विद्यालयामध्ये बीसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षणही घेत आहे. त्यानेच शिवराज उर्फ बंटी गायकवाड (रा. आळंद, ता जाफराबाद) याला सांगितले की तू आमच्या सोबत चल तुलाही पैसे भेटतील व सोबत घेऊन गेले, अशी माहिती एक अपहरणकरता असलेला बंटी याच्याकडून मिळाली आहे. हे चौघे संभाजीनगर येथून चैतन्याचे अपहरण केल्यानंतर भरधाव वेगात गाडीमध्ये निघाली. गाडीतच या चौघांनीही मद्य प्राशन केले. दारूच्या नशेतच गाडीचा अपघात झाला व घटनास्थळावर गंभीर जखमी प्रणव शेवटी पकडला गेला. त्याच्या चौकशीतूनच या सर्व अपहरणाचे सर्व प्रकरण उघडकीस आले व सर्व आरोपी पर्यंत पोहोचता आले व अपहरण केलेल्या चैतन्याची सुखरूप सुटका झाली. लोकेशनच्या माहितीच्या आधारे जालना पोलिसांसोबत छत्रपती संभाजीनगर पोलिसांचे देखील पथक जाफराबाद तालुक्यातील ब्रह्मपुरी येथे रवाना झाले. यावेळी दिलेल्या लोकेशनवर पोलिसांनी तत्परतेने छापा टाकत अपहरण झालेल्या ७ वर्षीय चैतन्य तुपेची सुखरूप सुटका केली. यावेळी बंटी गायकवाड याच्यासह हर्षल असे अन्य दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आली. चौकशीत हे तिन्ही आरोपी ब्रह्मपुरी येथील रहिवाशी असल्याचे समजते. पोलिसांनी चैतन्यची सुखरूप सुटका केली. त्यानंतर त्याचे मोबाइलवर घरातल्या मंडळींशी बोलणे करून दिले. आई-बाबांचे चेहरे दृष्टीस पडतास चैतन्यच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने चैतन्य आले. त्याने हासून घरातल्या सर्वांशी गप्पा मारल्या. आता आपण पोलिसांसोबत घरी येतोय असा निरोप दिला. घरातल्या मंडळींना टाटा करत फोन ठेवला. हा व्हिडिओ सुद्धा समोर आला आहे. या कारवाईवर पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी प्रतिक्रिया दिली आहे, ते म्हणाले, छत्रपती संभाजीनगर येथून अपहरण झालेल्या चैतन्य तुपे या ७ वर्षीय मुलगा सापडला असून या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई जालना पोलिसांसह छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी पार पाडली आहे.

### हीच 'ती' गाडी....



आरोपी दुसऱ्या गाडी ने मुलाला घेऊन पळाले चार आरोपी तर एक जखमीला भोकरदन येथे दवाखान्यात भरती करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगरचे सिटी चौक पोलिस ठाणे येथील विनोद परदेशी यांनी फोटो शेअर करुन माहिती दिली होते. त्यांच्याशी सामाजिक कार्यकर्ते एल.डी. ताटू हे देखील संपर्क होते.

# लतादीदीविना सुनेसुने हिंदी संगीतविश्व!

**लता** मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना 'भारतीय गानकोकिळा' म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना ''लता दीदी'' म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते.

लतादीदी मंगेशकरांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्यप्रदेश- ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला.



**स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी जेव्हा लतादीदींच्या आवाजातील 'ए मेरे वतन के लोगों, जरा आँखों में भर लों पानी!' हे गाणे ऐकले, तेव्हा त्यांचे डोळे पाण्यांनी डबडबले होते. ज्यांचा शासनाने महाराष्ट्र भूषण व भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव केला आहे, अशा जादुई आवाजाच्या धनी गानसम्राज्ञी लताजींच्या पावन चरणी श्रीकृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखरुपातील श्रद्धासुमने अर्पण करीत आहोत... संपादक.**

लतादीदींनी 'नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी' हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या 'किती हंसाल?' या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना 'नवयुगची पहिली मंगळागौर' या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी 'नटली चैत्राची नवलाई' हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले. इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ- भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या 'आपकी सेवा में' या हिंदी चित्रपटासाठी 'पा लागूं कर जोरी' हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात- बडी माँमध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी 'माता तेरे चरणों में' हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली.

इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ- देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलाम अली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. त्या काळात हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांचे गीतकार प्रामुख्याने मुस्लिम कवी असत. त्यामुळे गाण्यांच्या भावकाव्यात भरपूर उर्दू शब्द असत. एकदा सुप्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी लताजींच्या भारतीय हिंदी गाण्यातील मराठी उच्चारांसाठी तुच्छतादर्शक शेरा मारला, तेव्हा त्यांनी शफी नावाच्या मौलवींकडून उर्दू उच्चारांची अक्षरे गिरवून घेतली होती. लोकप्रिय चित्रपट महलचे ''आयेगा आनेवाला'' हे गाणे त्यांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे ठरले. या गाण्याचे संगीतकार खेमचंद प्रकाश होते, तर चित्रपटात गाणे अभिनेत्री मधुबालाने म्हटले होते. गुलाम हैदरांनी लताजींची ओळख तेव्हा शहीद या हिंदी चित्रपटावर काम करीत असलेले निर्माते शशिधर मुखर्जींशी करून दिली. मात्र मुखर्जींनी लताजींचा आवाज अतिशय बारीक असल्याच्या बहाण्याने नाकारला. तेव्हा हैदरांचे थोड्या रागात उत्तर होते, 'येणाऱ्या काळात निर्माते आणि दिग्दर्शक लताजींचे पाय धरतील आणि आपल्या चित्रपटांसाठी गाण्याची याचना करतील.' त्यांनी लताजींना मजबूर या चित्रपटात ''दिल मेरा तोडा'' हे गाणे म्हणण्याची अमूल्य संधी दिली.

लतादीदी मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह ग्रंथाली प्रकाशनाने सन १९९५च्या आसपासच्या वर्षी प्रसिद्ध केला होता. त्याचे संपादन मधुवंती सप्रे यांनी केले होते. पुढे हे पुस्तक मिळणे कठीण झाले. तेव्हा जयश्री देसाई यांच्या पाठपुराव्यामुळे मैत्रेय प्रकाशनने ''फुले वेचिता'' या नावाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. लतादीदींनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. आवाजाला ईश्वरी देणगी लाभलेल्या लतादीदी मंगेशकर यांना श्वसनाचा त्रास, न्युमोनिया व कोरोनाची लागण झाल्याने त्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होत्या. अशातच लतादीदींनी दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात चिरनिद्रा घेतली. त्यांचे कुटुंबीय, मित्रमंडळी व चित्रपटसृष्टी शोकसागरात बुडाली होती. संपूर्ण भारत देशावर शोककळा पसरली. त्यांच्या जाण्याने जनता हुंदके देऊन रडली होती.

!! लतादीदींना व त्यांच्या अविस्मरणीय स्मृतींना श्रद्धांजली अर्पूण विनम्र अभिवादन !!

श्री. एन. कृष्णकुमार, से.नि. अध्यापक.
(भारतीय थोरपुरुषांचे जीवनचरित्र अभ्यासक)
गडचिरोली, भ्रमणध्वनी-

## सामान्य व्यक्तीला केंद्रस्थानी मानून प्रशासन गतिमान करा

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या महसूल अधिकाऱ्यांच्या बैठकीत सूचना. सामान्य व्यक्तीला प्रशासनाकडून मोठ्या अपेक्षा असून त्यांना केंद्रस्थानी मानून प्रशासन गतिमान करा अशा सूचना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी तालुक्यातील नंद्राबाद प्रथम प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात आयोजित केलेल्या महसूल अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिल्या .

जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत कार्यरत असलेल्या जिल्हाभरातील महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक प्रथम प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित करण्यात आली होती या बैठकीला गौण खनिज, गृह शाखा, सामान्य प्रशासन ,संजय गांधी योजना ,रोजगार हमी योजना, पाणीपुरवठा ,पुनर्वसन, करमणूक अकृषीक शाखा.यासह इतर विभागांचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.



बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी यांनी विविध विभागांना दिलेले उद्दिष्ट त्यांनी वेळेत साध्य करावे तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचना दिल्या.

बैठकीस निवासी जिल्हाधिकारी विनोद खिरोळकर अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे.उपजिल्हाधिकारी संगीता राठोड. निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके. प्रवीण फुलारी सुचिता शिंदे उमाकांत पारधी एकनाथ बंगाळे कन्नडचे उपजिल्हाधिकारी संतोष गोरड वैजापूरचे अरुण जराड पैठणचे सारंग चव्हाण खुलताबादचे तहसीलदार स्वरूप कंकाळ कन्नडचे तहसीलदार विद्याचरण कडव कर पैठणचे तहसीलदार सारंग चव्हाण फुलंब्रीचे तहसीलदार कृष्णा कानगुले सोयगावच्या तहसीलदार मनीषा मेने वैजापूरचे तहसीलदार सुनील सावंत तहसीलदार दिनेश झापले अप्पर तहसीलदार नितीन गरजे शिवानंद बिडवे का.वी सावने विशाल शास्त्री यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते बैठकीच्या यशस्वीतेसाठी अनिल भगत यांनी परिश्रम घेतले.



**तहसीलदार पांडुरे साहेब यांच्या हस्ते ज्ञानदेव मोहिते यांना विशेष कार्यकारी अधिकारी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्यांच्या मित्रमंडळींनी अभिनंदन केले.**

# सिडकोने रेकनरचा पुनर्विचार करावा नसता संकल्पनाच मातीमोल - राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्वतःच्या मालकीचे घर ही संकल्पनाच सिडकोने माती मोल केली केलेली असुन सिडको फ्री होल्ड बाबत शासनाने अनेकदा वरवंटाच फिरवला असुन हीच आमची खंत आहे म्हणून *सिडकोचे फ्री होल्ड सम तर नाही ना* ? असा प्रश्न सर्व सामान्य नागरीकां मध्ये निर्माण झाला असुन तत्कालीन अध्यक्ष पालकमंत्री संजय शिरसाट यांनी राज्यांतील समस्त सिडको हडको वासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असुन सद्य स्थिती पहाता स्वतःच्या मालकीचे घर ही संकल्पनाच मातीमोल झाली असुन सिडकोने रेडी रेकनरचा पुनर्विचार केल्याशिवाय छत्रपती संभाजीनगर-वाळूज-नांदेड -नाशिक व नवी मुंबई येथील मालमत्ता धारकांना मुळीच न्याय मिळणार नाही असे स्पष्ट प्रतिपादन सिडको हडको नागरी कृती समिती महाराष्ट्र चे मुख्य निमंत्रक आणि सिडको समस्यांचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

मुळ मागणीची माहिती देतांना ते म्हणाले की,प्रीमियम सुद्धा ज्या दिवशी मालमत्ता नागरिकांना दिली त्या दिवशीचाच रेकनर वापरण्याची मागणी त्यांनी केली असुन राज्य भरातील विविध सेक्टर्स मध्ये सिडको निर्मित गाळेधारकांना-मालमत्ता धारकांना प्रीमियम शुल्कातून मुभा द्या आणि हे करतांना सिडकोचा१९९७ सालचा फ्री होल्ड ठरावच मूळ दस्त समजावा अशी महत्वपुर्ण मागणी अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील त्यांनी केली असुन,तसे लेखी पत्रच त्यांना सिडको कडून देण्यात आलेले होते हे विशेष होय.

शासनाने आता कुठलाही आडपडदा न ठेवता किंवा ' फ्री होल्ड सम ' असा किंवा इतर कुठलाही शब्दच्छल न करता आमच्या मुळ मागणी प्रमाणे मालमत्ता ' कायदेशीर फ्री होल्ड ' करून शब्दधर्म पाळावा असे नम्र आवाहन त्यांनी महाराष्ट्र शासनाकडे व सिडको कडे केले आहे.शासनाकडे व सिडको प्रशासना कडे गेली २५ वर्षे सातत्याने ' लीज होल्डचे फ्री होल्ड करा 'ही मागणी त्यांनी लाऊन धरली आहे हे विशेष असुन तत्कालीन सगळ्याच प्रशासकांनी फ्री होल्ड करण्याचे आश्वासन दिलेले होते. त्यामुळे उच्च न्यायालयात दाद मागण्याची गरज पडली नव्हती, आणि मालमत्ता नक्कीच फ्री होल्ड होणार याची खात्री खुद्द सर्वच मुख्यमंत्री ज्यात उद्धव ठाकरे - एकनाथ शिंदे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दिली होती. परंतु तत्कालीन सिडकोचे संचालक मंडळाने याला नकार दिला होता आणि त्याच मूळे सिडको फ्री होल्ड बाबत शासनाने अखेर वरवंटाच फिरवला होता आणि नेमकी हीच आमची आणि समस्त सिडको हडको वासीयांची खंत आहे.याबाबत अत्यंत अभ्यासात्मक विवेचन सिडको हडको समस्यांचे अभ्यासक म्हणुन डॉ राजेंद्र दाते पाटील अनेक वेळेस लेखी मांडले आहे. फ्री होल्ड झाल्याच्या मुद्द्यावर मोठया मोठय जाहीराती प्रसिद्धी करण्यात आल्या होत्या.परंतु हा निर्णय सत्य नसल्याचे सातत्याने सामोरे आले आहे. शासन आणि सिडको कडून सर्व सामान्य जनतेच्या स्वप्नांवर घाला घातला गेला होता असे म्हणण्यास वाव निर्माण झाला होता तो संजय सिरसाट यांनी न्याय देऊन मालकी हक्क व पी आर कार्ड देऊन दुर करण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यांचा कार्यकाळ अपुरा ठरला होता अशी भावना डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केली आहे.



स्वतःच्या मालकीचे घर ही संकल्पनाच मातीमोल झाली

फ्री होल्ड बाबत नोटिफिकेशन किंवा अध्यादेश निघू द्या तेव्हाच यावर शिक्कामोर्तब झाला असे म्हणता येइल असे आम्ही वारंवार सांगत होतो.सिडको बोर्डाने आपला स्वतःचा ठराव मंजुर करून लीज होल्डचे फ्री होल्ड करण्यास १९९७ सालीच मान्यता प्राप्त करण्यात आली होती असे स्पष्ट नमुद केलेले पत्रच सिडको संचालक मंडळाने डॉ राजेंद्र दाते पाटील यांना अग्रेशीत केलेले आहे. एवढे सगळे सुटसुटीत असतांना अचानक शासनाचे प्रतिनिधी आणि सिडको बोर्डाचे तत्कालीन अध्यक्ष प्रशांत रामशेठ ठाकुर यांना फ्री होल्ड करता येणार नाही असे बेताल वक्तव्य करून जनतेची दिशाभुल केली होती आणि तसे करण्याचा काही एक अधिकार त्यांना नसुन त्यांनी जनतेच्या भावना दुख:वल्या होत्या हे तेंव्हाच त्यांनी स्पष्ट केले होते. त्या वेळेस राज्य भरातील सिडको-हडको वासियांच्या स्वप्नावर जणु वरवंटा फिरवण्याचा हा प्रकार घडला असुन जनता अशा कृत्याला कधीच थारा देणार नसल्याचे परखड मत त्यांनी व्यक्त केले होते आणि म्हणून शासनाने या सर्व घडामोडीवर नव्याने विचार करून नवी मुंबई - सिडको, वाळूज,छत्रपती संभाजी नगर, नांदेड,नाशिक,खारघर,कामोठे येथील रहिवासीयांना न्याय द्यावा अशी मागणी सिडको हडको नागरी विकास कृती समिती महाराष्ट्राचे निमंत्रक आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे. सिडकोच्या या सर्व बाबींचा संपूर्ण इतिहास तारखे सह महाराष्ट्राला कळावा म्हणुन सिडको-हडको नागरी विकास कृती समिती महाराष्ट्र नमुद करीत असुन त्यावेळेस प्रामुख्याने ' त्या काळी एस जी बर्वे बांधकाम विभागाच्या सचिव यांचे अध्यक्षते खाली एक अभ्यास गट तयार केला गेला ' होता त्यांना नियोजीत शहरे, वाहतूक समस्या, खुल्या जागा,घरांच्या समस्या, मोठया शहरात कारखाने काढण्यावर दिलेला भर या सर्व समस्या सोडविण्या साठी शिफारशी करण्याची जवाबदारी दिल्या गेली होती. दरम्यान १९६५ साली बर्वे ग्रुप यांनी मेट्रोपॉलीटीन समस्या बाबतच्या शिफारशी कराव्यात तसेच प्रा.डी आर गाडगीळ समितीची नियुक्ती झाली होती त्यांनी आपला अहवाल १९६६ साली दाखल करून विभागीय नियोजन बोर्ड - ऑथॉरिटी स्थापना करण्याची शिफारस केली होती. त्यानंतर कुठे एम आर टी पी कायदा १९६६ तयार होऊन जानेवारी १९६७ तदनंतर मुंबई नोटीफाईड होऊन विभागीय नियोजन मंडळ म्हणजे रिजनल प्लँनिंग बोर्ड स्थापना आय सी एस अधिकारी एल जी राजवाडे यांचे अध्यक्षते खाली मुंबईत बोर्डची स्थापना झाली.मुंबई मेट्रोपॉलीटीन रिजन स्थापना अशा विकास रुपी अनेक घडामोडी घडत गेल्या नंतर १९७० च्या दशकात विभागीय विकास मसुदा अंतीम करण्यात आला.सिडको कडुन नागरिकांनी रहीवाशी गाळे, प्लॉट, व्यावसायिक प्लॉट तसेच गृहनिर्माण संस्था अत्यंत मेहनतीने खरेदी केल्या आहेत. फ्री होल्ड करणे बाबत अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना सिडकोचे ठराव मंजुर झाल्याचे पत्र प्राप्त आहे. म्हणुन शासनाने तात्काळ नव्याने विचार करून राज्यातील सिडको वासीयांना त्यांच्या मालमत्ता बाबत लीज होल्डचे फ्री होल्ड करून मालकी हक्क तर द्यावाच सोबत त्यांना पीआर कार्ड तसेच या मालमत्तेचे ते मालक असल्याची नोंद घेण्याचे आदेश संबंधीत जिल्हाधिकारी नगर परिषद, महानगर पालिका व स्थानीक स्वराज्य संस्थांना द्यावे व सोबतच ज्या दिवशी मालमत्ता नागरिकांना हस्तांतरीत केली त्या दिवशीचा रेडी रेकनर वापरून ही प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी अशी मागणी सिडको हडको नागरी विकास कृती समिती महाराष्ट्राचे निमंत्रक जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी शासना कडे केली आहे.

# शिक्षक साहित्यसंमेलन साहित्यामुळे जीवन प्रेरणा मिळते- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.५ (प्रतिनिधी) - साहित्य हे जीवन प्रेरणा देण्यासाठी खूप उपयुक्त असते. त्यातून मनावर संस्कार होतात. असे मनावर प्रेरणा करुन शिक्षणाचा संस्कार देणारे साहित्य निर्माण व्हावे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज एमआयटी येथे केले.

दुसरे शिक्षक साहित्य संमेलन एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात आयोजित करण्यात आले. संमेलनाचे उद्धाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, संमेलनाध्यक्ष आशा खडतरे-डांगे, मावळते अध्यक्ष डॉ. हबीब भंडारे, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) वंदना चव्हाण, जिल्हा शिक्षणाधिकारी(मध्य.) आश्विनी लाटकर, शिक्षणाधिकारी (योजना) आशा भुमकर, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था प्राचार्य देशमुख, एमआयटी चे संचालक मुनिश शर्मा आदी उपस्थित होते.



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शिक्षकांसाठी होणारे हे साहित्य संमेलन हे काळाची गरज आहे. शिक्षकांमधील साहित्यिकाला वाव देण्याची गरज आहे. शिक्षक हा समाज घडवणारा व्यक्ती असतो. आपण ज्या क्षेत्रात कार्य करीत आहात त्याचे सोने करावे. समाजाचा साहित्याशी संबंध दूर होत चालला आहे. त्यासाठी वाडमयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. हे संस्कार विद्यार्थी दशेत करण्याची गरज असून ते कार्य केवळ शिक्षकच करु शकतात. कविता, गितांद्वारे हे भाषेचे संस्कार आपण विद्यार्थ्यांवर करुन त्यांच्यामध्ये वाचन प्रेरणा निर्माण करावी. जेणे करुन वाचन संस्कृतीचे संवर्धन होईल. साहित्यामुळे जीवनप्रेरणा निर्माण होते. सकारात्मक बदलाची सर्व प्रेरणा ही साहित्यातून मिळते. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत साहित्य पोहोचू शकते, त्यादृष्टीने अशा साहित्यसंमेलनांची गरज आहे.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सांगितले की, शिक्षकांनी स्वतः मधील कलागुणांचा वापर मुलांना घडविण्यासाठी करावा. त्याद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी. त्यादृष्टीने शिक्षक साहित्य संमेलनाचे महत्त्व अधोरेखित होते. अजूनही यात खूप काम करण्याची गरज असून मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी याचा अधिक वापर शिक्षकांनी करावा. आपल्या जिल्ह्यातून विविध स्पर्धांमध्ये वा शैक्षणिक यश संपादन करुन राष्ट्रीय राज्यस्तरिय पातळीवर गेलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचे अनुभव हे इतर शिक्षकांनी जाणून घ्यावे. जिल्ह्यात शिक्षणाच्या क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन विद्यार्थी घडविण्याचे काम सुरु आहे. विशेष म्हणजे त्यात पालकांचाही तितकाच सहभाग आहे,असेही मीना यांनी सांगितले.

रमेश ठाकूर यांनी सुत्रसंचालन तर गीता तांदळे यांनी आभार मानले

# गव्हाच्या साठयावर निर्बंध; दर शुक्रवारी माहिती देणे अनिवार्य

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्रशासनाच्या अधिसुचनेअन्वये घाऊक व्यापारी/किरकोळ व्यापारी/ बिग चेन रिटेलर्स व प्रोसेसर्सकरीता गव्हाच्या साठ्यावर दि.३१ मार्चपर्यंत निर्बंध लागू केले आहेत. त्यासाठी प्रत्येकाकडे कमाल साठा किती असावा याचे प्रमाण ठरवून दिले असून दर शुक्रवारी आपल्याकडील साठ्याची माहिती संकेतस्थळावर प्रकट करणे अनिवार्य आहे,असे जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी कळविले आहे.

या अधिसुचनेनुसार, १. व्यापारी/घाऊक विक्रेता :- १००० टन, २.किरकोळ विक्रेता :- प्रत्येक आउटलेटसाठी ५ टन.,३.बिग चेन रिटेलर्स :- प्रत्येक आउटलेटसाठी ५ टन सर्व आउटलेटस आणि डेपोमध्ये जास्तीत जास्त स्टॉकची मात्रा (एकुण आउटलेटच्या ५ पट) टन व ४. प्रोसेसर्स :- ५०% मासिक स्थापित क्षमतेचे प्रमाण एप्रिल २०२५ पर्यंत उर्वरित महिन्यांनी गुणाकार केले, समान.


वरील प्रमाणे व्यापारी यांच्याकडे असणारा गव्हाचा साठा दि.११ डिसेंबर २०२४ च्या अधिसुचनेतील साठा निर्बंधापेक्षा जास्त असल्यास, तसे htt{s://evegoils.nic.in/ws.login या संकेतस्थळावर अधिसुचनेत ठरवून दिलेल्या साठ्याच्या मर्यादेपर्यंत गव्हाचा साठा कमी करणे आवश्यक राहील.तसेच केंद्र शासनाच्या पोर्टलवर गव्हाचा साठा नियमितप्रणे प्रकट करण्याबाबत शासनाने आदेशीत/ निर्देशीत केले आहे. त्याअनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी/किरकोळ व्यापारी/ बिग चेन रिटेलर्स व प्रोसेसर्स यांनी https://evegoils.nic.in/ws.login या संकेतस्थळावर विहीत मुदतीत प्रकट करावा. त्यानंतर याच संकेत स्थळावर दर शुक्रवारी साठा बाबतची माहिती नोंद करणे आवश्यक/अनिवार्य आहे. जिल्ह्यातील सर्व गहू व्यापाऱ्यांच्या आस्थापना, ज्या गहु साठा पोर्टलवर नोंदित नाहीत त्यांची नोंदणी करणे. पोर्टलवर एकदा साठा नोंद केल्यानंतर त्यामध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा नाही त्यामुळे व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडील गव्हाचा साठा (दर शुक्रवारी) उपभोक्ता मामले विभागाच्या https://evegoils.nic.in/ws.login या संकेतस्थळावर नोंदणी करून अपलोड करावा. शासनाने ठरवुन दिलेल्या निर्बंधापेक्षा गव्हाचा साठा जास्त आढळून आल्यास व साठेबाजी करणाऱ्या संबंधीत व्यापाऱ्यांविरूद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये कडक कारवाई करण्यात येईल,असे जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी कळविले आहे.

# 'एक्झिट पोल'नुसार दिल्ली काबीज करण्याकडे भाजपाची 'कूच'

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिल्लीतील विधानसभा निवडणुकीसाठी मतदान बुधवारी संपले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, विविध सर्वेक्षण संस्थांनी संध्याकाळी ६.३० नंतर एक्झिट पोलचे निकाल जाहीर केले आहेत. यामध्ये आम आदमी पक्षाला (आप) मोठा धक्का बसताना दिसत आहे. २७ वर्षांनंतर भाजप दिल्लीत पुन्हा सत्तेत येत असल्याचे दिसून येत आहे. दिल्ली विधानसभेच्या एकूण ७० जागांसाठी निवडणूक लढवणाऱ्या ६९९ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झाले आहे. निवडणुकीचे निकाल ८ फेब्रुवारी रोजी जाहीर होतील, पण प्रत्येकाच्या मनात प्रश्न निर्माण होत आहे की यावेळी दिल्लीत सरकार कोण स्थापन करेल. याबाबत एक्झिट पोल सर्व्हे येऊ लागले आहेत. यामध्ये आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसताना दिसत आहे. सर्व्हेनुसार भाजप दिल्लीत सरकार स्थापन करू शकते. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी बुधवारी संध्याकाळी मतदान संपल्यानंतर, ११ एक्झिट पोल जाहीर झाले. भाजपला ९ पोल्समध्ये बहुमत मिळण्याची अपेक्षा आहे तर २ मध्ये आम आदमी पक्ष (आप) सरकार स्थापन करेल अशी शक्यता आहे. पोल ऑफ पोल्समध्ये भाजपला ३९, आपला ३० आणि काँग्रेसला एक जागा मिळताना दिसत आहे. जेव्हीसी आणि पोल डायरीने त्यांच्या एक्झिट पोलमध्ये इतरांनाही प्रत्येकी १ जागा मिळू शकते असा अंदाज वर्तवला आहे.

# जिल्हा वार्षिक योजना प्रारुप आराखडा बैठक-२०२५-२६ जिल्हा विकासासाठी भरीव निधी देणार-उपमुख्यमंत्री अजित पवार





**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्याचा सन २०२५-२६ चा आराखडा हा १२०० कोटी रुपयांचा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी शासन भरीव निधीची तरतूद करेल. प्राप्त निधीचा विनियोग हा दर्जेदार, गुणवत्तापूर्ण कामे करावा,असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त आणि नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी आज दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ (सर्व साधारण) च्या राज्यस्तरीय बैठकीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या आढावा घेतला. बैठकीस राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त विभागाचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल, पालक सचिव हर्षदीप कांबळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे हे दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. तर जिल्हा मुख्यालयातून आ. रमेश बोरनारे, आ. अनुराधाताई चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच सर्व यंत्रणाप्रमुख आदी उपस्थित होते.

खर्चाचा आढावा

उपमुख्यमंत्री पवार यांनी सन २०२४-२५ च्या मंजूर नियतव्ययाचा खर्चाचा आढावा घेतला. जिल्ह्याला सन २०२४-२५ साठी ६६० कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर असून ५१६ कोटी रुपयांच्या कामांच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. त्यातील २२५ कोटी निधी प्राप्त झाला असून त्यातील १८७ कोटी रुपये निधी खर्च झाला आहे.

१२०० कोटी रुपयांचा आराखडा

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सादरीकरण करुन जिल्ह्याच्या सर्वसाधारण योजनांसाठी १२०० कोटी रुपयांचा आराखडा सादर केला. त्यात प्रामुख्याने जिल्ह्यातील विविध प्रमुख कामांसाठी निधीची मागणी करण्यात आली. शहरी सुविधांचा विकास, जिल्ह्यात रेशीम उत्पादन वाढीला चालना देणे, घृष्णेश्वर विकासासाठी १५६.६३ कोटी रुपयांचा विकास आराखडा अशा विविध विकासकामांचा व योजनांचा त्यात समावेश आहे.

लोकसंख्येची वाढ पाहता वाढीव निधीची पालकमंत्र्यांची मागणी

पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले की, जिल्ह्यात येऊ घातलेली औद्योगिक गुंतवणूक पाहता येत्या पाच वर्षात शहराची लोकसंख्या वाढणार आहे. त्यादृष्टीने तयार करावयाच्या पायाभुत सुविधा विकास व अन्य आवश्यकतांसाठी वाढीव नियोजन करण्यात आले आहे.तसेच जिल्ह्यातील ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत आहे. त्यामुळे नागरी सुविधा विकासासाठी निधी मिळावा,अशी मागणी पालकमंत्र्यांनी केली.

सौर उर्जेच्या वापरासाठी स्वतंत्र तरतूद करावी- ना. अतुल सावे

इमाव कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले, पर्यटनाला चालना देण्यासाठी जिल्ह्यात अधिक सुविधांचा विकास होणे आवश्यक असून त्यासाठी अधिक निधी मिळावा. तसेच सौर उर्जेचा अंगिकार करण्याबाबत आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचे उपक्रम हाती घ्यावे- पालक सचिव कांबळे

पालकसचिव कांबळे यांनी सांगितले की, येत्या पाच वर्षात छत्रपती संभाजीनगर शहराचा मोठ्याप्रमाणावर विकास होणार आहे. तसेच शहरात उद्योगांची गुंतवणूक होत असून उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी उपक्रम हाती घ्यावेत. त्यासाठी नाविन्यपूर्ण योजनांमधील २० टक्के निधी राखीव ठेवावा आणि हा निधी रोजगार निर्मितीसाठीच्या उपक्रमांसाठी खर्च करावा,अशी सुचना त्यांनी केली.

'घाटी'साठी स्वतंत्र तरतूद

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, जिल्ह्याला जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न आहे. प्रस्तावित आराखड्यातील निधी हा शिक्षण, आरोग्य,कृषी, महिला व बालविकास, दिव्यांग कल्याण अशा सामाजिक क्षेत्रात त्या त्या आवश्यक प्रमाणात खर्च करावा. शाळांच्या विकासाठी मनरेगाच्या निधीतून कामे करण्यात यावी. स्वच्छता उपक्रमांना प्राधान्य द्यावे. जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर सौर उर्जेचा अवलंब करावा. त्यासाठी उचित तरतूद करण्यात येईल. जिल्ह्यात महत्त्वाचे असणारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अर्थात 'घाटी' च्या विकासासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येईल. जिल्ह्यातील अन्य सुविधा विकासासाठी उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा अधिकाधिक वापर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.


जिल्हा प्रशासनाचे केले कौतुक

आपल्या संबोधनात श्री. पवार यांनी जिल्ह्यात होत असलेल्या विविध कामांबाबत प्रशासनाचे कौतुक केले. संत ज्ञानेश्वर उद्यान पुन्हा सुरु केल्याबद्दल जिल्हाधिकारी स्वामी यांचे तर मनपातर्फे राबविण्यात येणाऱ्या लोकोपयोगी उपक्रमांबद्दल आयुक्त जी. श्रीकांत यांचे अभिनंदन केले. देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सची करतांना राज्याचे त्यात १ ट्रिलियन डॉलर्सचे योगदान असावे यादृष्टिने प्रत्येक क्षेत्रात प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत.

# श्री.१००८ संभवनाथ दिगंबर जैन मंदिराच्या वर्धापन दिवसानिमीत्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.१००८ संभवनाथ दिगंबर जैन मंदिर बजाजनगर पंढरपुर मंदिराच्या वर्धापन दिवसा निमीत्त दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी १३ व्या वर्धापन दिवसा निमीत्त ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता धर्मध्वजारोहन राजकुमार अतुल, शितल गंगवाल परिवार यांच्या वतीने होईल. , ८ वाजता शोभायात्रा, ८.३० भगवांताचा पंचामृत अभिषेक, ९ वाजता विधान, सौधर्म इंद्र इंद्रानी म्हणुन सौ.स्विटी कार्तिक गंगवाल हे लाभले आहे. यावेळी . सकाळी ११ वाजता तुषार,विजय,सौ. कनकमाला,सौ.समता,यशस्वी,अधिराज साहुजी परिवार जामखेडकर व समस्त दिगंबर जैन समाज बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. कार्यकमासाठी प्रमुख अतिथी म्हणुन पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, अध्यक्ष भारतवर्षीय दिगंबर जैन तिर्थरक्षा कमिटीचे संजय पापडीवाल तसेच राजाबजार जैन पंचायतचे अध्यक्ष महावीर पाटणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच यावेळी आचार्य शिरोमणी विदयासागरजी महाराज यांच्या प्रथम समाधी दिवसा निमीत्त विनयांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संध्याकाळी ७ वाजता भगवंताची संगीतमय आरती होणार आहे. तसेच संध्याकाळी ८ वाजता सांस्कृतिक कार्यकम व भजन संध्या आयोजीत करण्यात आली आहे. तरी समाज बांधवांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष डॉ राजेंद काला, सचिव सुजित गोधा, उपाध्यक्ष अतुल चुडीवाल, कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, सदस्य दिपक काला, महावीर पाडे, सचिन पाटणी, योगेश कासलीवाल, सुनिल पांडे, जीवन गंगवाल, यांच्यासह सल्लागार डॉ.सुरेश बडजाते,रविंद्र ठोले व सकल जैन समाज बजाजनगर, पंढरपुर, वाळुज, सिडको महानगर १ यांची केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.



हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**